



# वन विभाग
# महाराष्ट्र राज्य


महाराष्ट्र वन विभाग


# 1. संकेतस्थळ

## वन विभागाचे स्वतंत्र संकेतस्थळ

www.mahaforest.gov.in


## अद्ययावत माहिती व वापरण्यास सुलभ







# 1. संकेतस्थळ

## सुरक्षित (SSL Encryption सह)






## माहिती अधिकार कायदा अंतर्गत स्वयंप्रकटीकरण



# 1. संकेतस्थळ

## लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गतच्या सेवांकरिता संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणाली (एकूण 13 सेवा)



# 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

**केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव**

केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव

1. पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समित्यांना मुदतवाढ बाबत प्रस्ताव

2. पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्र फ़ेरनिश्चितीबाबत प्रस्ताव

केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा

1.70 % पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समित्यांना मुदतवाढ


2. पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्र फ़ेरनिश्चितीबाबत केंद्रीय समितीची दिनांक 17.4.25 रोजी मुंबई येथे बैठक

# 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

## केंद्रीय योजनांचा लक्षांक व केंद्र हिस्सा समरुप वितरित राज्य हिस्सा

| अ. क्र. | योजनेचे नाव | केंद्र हिस्सा (रु. लाखात) | राज्य हिस्सा (रु. लाखात) | लक्षांक |
|---|---|---|---|---|
| 1 | व्याघ्र प्रकल्प | 4149.7 | 3458.67 | 100 % |
| 2 | वन्यजीव अधिवासाचा एकात्मिक विकास | 622.07 | 414.70 | 100 % |
| 3 | जंगलातील आग प्रतिबंधक आणि व्यवस्थापन योजना | 427.21 | 298.32 | 100 % |
| 4 | हत्ती प्रकल्प | 27.01 | 18.008 | 100 % |
| 5 | राष्ट्रीय बांबू मिशन | 453 | 302 | 100 % |
| 6 | राष्ट्रीय कृषी विकास योजना - कृषी वनीकरण | 150 | 100 | 100 % |
| | एकुण | 5828.99 | 4591.698 | |

## केंद्र पुरस्कृत योजना





## केंद्र शासनाच्या विविध विभागांकडुन प्राप्त पत्रे

| प्राप्त पत्रांची संख्या | कार्यवाही पुर्ण | प्रगतीपथावर |
|---|---|---|
| 9 | 2 | 7 |

# 3. स्वच्छता

## अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण (मार्च 2025 अखेर)





## मुदतबाह्य अभिलेख नष्ट करणे

1. सर्व नस्ती स्कॅन करण्याचे अभियान
2. मुदतबाह्य क व ड वर्ग नस्त्या नष्ट करण्यात आल्या आहेत









# 3. स्वच्छता

## जुन्या व निरुपयोगी जड वस्तुंची विल्हेवाट :- कार्यवाही पुर्ण



अद्ययावत जडवस्तु संग्रह नोंदवही

## जुन्या वाहनांचे निर्लेखन

वन विभागांतर्गत निर्लेखन योग्य सर्व 112 वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. 31.03.2025 अखेर एकही वाहन निर्लेखनाकरिता प्रलंबित नाही.




जुनी निर्लेखित वाहने




जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदल्यात खरेदी केलेली नवीन वाहने

# 4. तक्रार निवारण

**तक्रार निवारण**

आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण

| प्राप्त | निकाली | प्रलंबित |
|---|---|---|
| 259 | 257 | 2 |

▪पी.जी.पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण

| प्राप्त | निकाली | प्रलंबित |
|---|---|---|
| 59 | 54 | 5 |

▪लोकशाही दिनामधील तक्रारींचे निराकरण :- प्रलंबित नाही

अभ्यागत भेटीचे नियोजन व प्रसिध्दी :- सर्व अभ्यागतांना प्राधान्याने तात्काळ भेट देण्यात येते.

# 4. तक्रार निवारण

जनता दरबार, लोकप्रतिनींधी सोबत बैठका व ईतर माध्यमातून सर्वोच्च पातळीवरून जनतेच्या तक्रारींचे प्राधान्याने निवारण









# 5. कार्यालयीन सोई सुविधा

- कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
- कर्मचारी, अभ्यांगत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा
- महिला कर्मचारी, अभ्यांगत यांचेसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सुविधा



- अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था



# 5. कार्यालयीन सोई सुविधा



- कार्यालयाचे सौंदर्यीकरण



- कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक



# 6. कामकाजातील सुधारणा

| | |
|---|---|
| ▪ई ऑफिस प्रणाली वापरण्याचे प्रमाण | · सर्व कारभार ई ऑफिस प्रणालीद्वारे |
| ई ऑफिस प्रणालीतील 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा | · ई ऑफिस प्रणालीतील 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा |
| ई ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी | • 100 % **नस्ती ई** ऑफिसद्वारे निकाली |

# 6. कामकाजातील सुधारणा

## वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणा-या बातम्यांबाबत स्पष्टीकरण / खुलासा

| महिना | प्रसिद्ध बातम्याची संख्या | खुलास्यांची संख्या |
|---|---|---|
| जानेवारी | 6 | 6 |
| फेब्रुवारी | 6 | 4 |
| मार्च | 2 | 1 |

### बातमी


लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

# विदर्भात आणखी दोन वाघांचा बळी

## अवघ्या २२ दिवसांत ११ वाघ मृत्युमुखी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर/वर्धा :** राज्यात वाघांच्या मृत्यूचे सत्र सुरूच असून बुधवारी पुन्हा दोन वाघ दगावले. वर्धा जिल्ह्यात समुद्रपूर-गिरड महामार्गावर धोंड गावजवळ वाहनाच्या धडकेत चार महिन्यांच्या मादी बछड्याचा मृत्यू झाला. तर पेंच व्याघ्र प्रकल्पात नागलवाडी येथे आणखी एका वाघाच्या मृत्यूची घटना समोर आली आहे. नव्या वर्षाच्या पहिल्या २२ दिवसांतच ११ वाघांचा मृत्यू झाला आहे.

आतापर्यंत मृत्यू झालेल्या वाघांत दोघांची शिकार झाली असून दोन बछडे उपासमारीने मृत पावले. दोन वाघांचा मृत्यू संशयास्पद आहे. दोन वाघ रेल्वे आणि रस्ते अपघातात मृत्युमुखी पडले. यातील बरेच मृत्यू

वन खात्यात वन्यजीव संवर्धनाच्या नावाखाली तांत्रिक क्षमतेवर भर देण्यात येत आहे. प्रत्यक्ष काम करणे कमी झाले आहे. - किशोर मिश्रीकोटकर, सेवानिवृत्त विभागीय वनाधिकारी

हे वनक्षेत्राच्या बाहेरील असल्यामुळे शिकारीचा धोका अधोरेखित झाला आहे. प्रकल्प आणि इतर कारणांमुळे वाघांच्या कॉरिडॉरचे जाळे तुटत असल्याचे रोडकिल्स इंडिया सिटिझन सायन्स कॅम्पेनचे मिलिंद परिवक्कम यांनी सांगितले.

### खुलासा


# व्याघ्रमृत्यूंबाबत गांभीर्याने उपाययोजना

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यात व्याघ्रमृत्यूंकडे सरकार गांभीर्याने पाहत असून वाघांचे अपघाती मृत्यू रोखण्याचे निर्देश वनाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली. मागील १६ वर्षांत राज्यात वाघांची संख्या सरासरी ३५०ने वाढली असून, केंद्र सरकारच्या निर्देशांप्रमाणे, राज्यातील वनक्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

राज्यात ३० डिसेंबर २०२४ ते २२ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये विविध घटनांमध्ये १२ वाघांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर, वनमंत्री नाईक यांनी मंगळवारी घेतलेल्या आढावा बैठकीत वरील माहिती समोर आली. मागील महिन्याभरात मृत्यू झालेल्या वाघांपैकी पाच वाघांचा मृत्यू हा आपापसातील संघर्षातून जखमी होणे, आजारपण इत्यादी नैसर्गिक कारणांमुळे झाला आहे, तर चार वाघांचा मृत्यू अन्य जनावरांसाठी लावलेल्या विजेच्या तारांचा धक्का बसल्याने किंवा वाहनांच्या धडकेने झाला आहे. तीन वाघांचा मृत्यू शिकारीमुळे झाल्याचे समोर आले आहे. या तीनही प्रकरणांमध्ये एकूण नऊ आरोपींना वन खात्याने अटक केली आहे. राज्यामध्ये २००६ मध्ये १०३ वाघ होते. २०१०मध्ये ही संख्या वाढून १६९ झाली. २०१४मध्ये यामध्ये आणखी वृद्धी होऊन ती १९० वर पोहोचली. २०१८मध्ये राज्यात ३२१ वाघ होते, तर २०२२मध्ये व्याघ्रगणनेमध्ये ४४४ वाघांची नोंद झाली, असे नाईक यांनी सांगितले.

**शिकार रोखण्यासाठी खबऱ्यांची नेमणूक**

- १६ वर्षांत राज्यातील वाघ ३५०ने वाढल्याची माहिती
- राज्यातील वनक्षेत्र ३० टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी प्रयत्न

**या उपाययोजना**

- जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ, बिबळे इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी उपाययोजनांची आखणी करण्यात येत आहे.
- विद्युत प्रवाहाचा धक्का लागून होणारे व्याघ्रमृत्यू थांबवण्यासाठी वनविभाग व महावितरण कंपनी मिळून प्रतिबंधात्मक उपाय करत आहे.
- अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरिता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
- व्याघ्र संरक्षण दलातील पथकांमार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त घालण्यात येते. तसेच श्वानपथकाद्वारे अंतर्गत गस्तीच्या माध्यमातून शिकाऱ्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना एम स्ट्रिप्स प्रणालीयुक्त मोबाइल देऊन त्याद्वारे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- अतिसंवेशील क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.



# 6. कामकाजातील सुधारणा

## वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणा-या बातम्यांबाबत स्पष्टीकरण / खुलासा



## ‘मानव-वन्यजीव संघर्ष थांबवून वाघांच्या व्यवस्थापनाला प्राधान्य’

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** वनखात्यासमोर सध्या मानव-वन्यजीव संघर्ष कसा थांबवायचा हा मोठा प्रश्न आहे. ‘प्रोजेक्ट टायगर’च्या योग्य अंमलबजावणीमुळे वाघांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे हा संघर्ष थांबवणे आणि वाघांचे व्यवस्थापन हे दोन प्राधान्यक्रम आमच्यासमोर आहेत, अशी माहिती वनखात्याचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी दिली. ‘लोकसत्ता’च्या नागपूर कार्यालयाला दिलेल्या विशेष भेटीदरम्यान ते बोलत होते.

म्हैसकर म्हणाले, मानव-वन्यजीव संघर्षात वाघ पकडणे हा उपाय नाही. किती वाघ जेरबंद करणार? त्यासाठी वाढणाऱ्या वाघांच्या व्यवस्थापनावर अधिक काम करावे लागणार आहे. त्यादृष्टीने वाघांसाठी ‘कॉरिडॉर’ महत्त्वाचा आहे आणि त्यावर वनविभाग गांभीर्याने काम करत आहे. संरक्षित क्षेत्राला लागून असणाऱ्या जागांवर गवताळ कुरणे तयार करणे, हा देखील त्यातलाच एक पर्याय आहे. यामुळे (पान ४ वर)

लो

**वनखात्याचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी ‘लोकसत्ता’च्या नागपूर कार्यालयाला भेट देऊन जंगल आणि वन्यजीव व्यवस्थापनासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती दिली.**

### वनखाते लोकाभिमुख झाले पाहिजे

वनखात्याकडून चुका होत नाहीत, असे नाही. चुका आमच्याकडूनही होतात. अशावेळी त्याविषयी बाहेर काही बोलले जात असेल तर त्यातून सुधारणा कशा करता येतील, एवढेच लक्षात घेतले पाहिजे. वनखाते लोकाभिमुख झाले पाहिजे. सर्वसामान्य नागरिक असोत वा प्रसारमाध्यमे, त्यांच्याशी संवादाचा पूल वनखात्यातील अधिकाऱ्यांकडून बांधलाच गेला पाहिजे. त्यामुळे दरम्यानच्या काळात तुटलेला संवादाचा पूल पुन्हा कसा बांधता येईल आणि खाते लोकाभिमुख कसे करता येईल, यावर आमचा भर असेल, असेही म्हैसकर यांनी सांगितले.

### वन्यजीवांप्रती सारेच संवेदनशील

वन्यजीवांप्रती आता सारेच संवेदनशील झाले आहेत. त्यामुळे थोडीही चूक झाली तर न्यायव्यवस्था देखील तातडीने दखल घेते, ही बाब चांगलीच आहे. अलीकडेच उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील वाघीण आणि तिच्या बछड्यांची पर्यटकांकडून कोंडी करण्यात आली. प्रसारमाध्यमांमध्ये वृत्त प्रकाशित झाले आणि न्यायव्यवस्थेने स्वतःहून याचिका दाखल करून घेतली. वनखात्यावर कोरडे ओढले. परंतु, त्याची सकारात्मक दखल घेतली पाहिजे, असेही म्हैसकर म्हणाले.

- सर्वोच्च पातळीवरून स्वतंत्ररित्या भेट देवून वृत्तपत्रांशी सुसंवाद साधण्यात येतो.
- सर्व वृत्तवाहिन्या व वृत्तपत्रे यांच्याशी सतत थेट संवाद साधण्यात येतो.



# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयिन बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (A.I.)

## नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षीत करणे



चंद्रपूर प्रशिक्षण अकादमी



कुंडल प्रशिक्षण अकादमी

- ✓ विभागाचे स्वतंत्र प्रशिक्षण धोरण
- ✓ त्यानुसार विभागा अंतर्गत 2 स्वतंत्र प्रशिक्षण अकादमी व 4 प्रशिक्षण संस्थांमार्फत मागील 6 महिन्यात एकूण 8233 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयिन बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (A.I.)

## चंद्रपूर प्रशिक्षण अकादमी



CAPACITY BUILDING COMMISSION

सत्यमेव जयते

Certificate No.
APP/22/N00051

*Certificate of Accreditation*

The training Institute **Chandrapur Forest Academy of Administration, Development and Management** is accredited as **उत्कृष्ट/Very Good** under the Capacity Building Commission's National Standards.

The Accreditation shall remain in force subject to continued compliance with the National Standards.The Accreditation needs to be renewed before the expiry date by the training institution following the due process of assessment.

Accreditation granted on **19/12/2023** is valid until **18/12/2025**

★★★☆☆

S.P. Roy
Secretary
Capacity Building Commission

Adil Zainulbhai
Chairperson
Capacity Building Commission

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयिन बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (A.I.)

**▪अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे**

- **अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याकरिता** SPARROW **व** MAHAPAR **या ऑनलाईन प्रणालींचा वापर**
- **31 मार्च 2024 पर्यंतचे सर्व गोपनीय अहवाल पुर्ण**

सेवाजेष्ठता याद्या प्रसिद्ध करणे व पदोन्नत्या करणे

- सर्व संवर्गाच्या 1.1.2025 रोजी पर्यंतच्या सेवाजेष्ठता याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.
- सेवाजेष्ठतेनुसार सर्व संवर्गाच्या पदोन्नत्या करण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे

**न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे**

- **न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा करणेकरिता** Manage My Lawsuit **या ऑनलाईन प्रणालीचा वापर (एकूण न्यायालयीन प्रकरणे** 1297)
- **विभागीय चौकशी प्रकरणांचा निपटारा करणेकरिता वारंवार आढावा (एकूण विभागीय चौकशी प्रकरणे** 71)

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयिन बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (A.I.)

## अधिकारी व कर्मचा-यांच्या पदोन्नत्या व ईतर बाबींविषयी तक्रारींचे सर्वोच्च पातळीवरून निराकरण





# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयिन बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (A.I.)

**कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी** ChatGPT, Gemini, Grok, Microsoft CoPilot, Claude, OpenAI **ईत्यादि** Artificial Intelligence Software **चा वापर दैनंदिन कामकाजात करण्यात येतो.**

**त्यासोबतच मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्याकरिता अशा संघर्षग्रस्त गावांजवळ** AI **तंत्रज्ञानाचा वापर करुन वन्यप्राण्यांच्या आगमनासंदर्भात पुर्वसुचना देणारी अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात आली आहे.**





# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

सदरच्या बाबी उद्योग विभागामार्फत हाताळण्यात येतात याकामी उद्योग विभागास आवश्यक ते सहकार्य करण्यात येते.

उदाहरणार्थ:-

1) उद्योगांकरिता Ease of Doing अंतर्गत वृक्षतोड परवानगी प्रक्रिया सुलभरित्या व ऑनलाईन पद्धतीने

2) लाकूड आधारित उद्योगांकरिता लाकूड व ईतर कच्चा माल eAuction पद्धतीने विक्री

3) Sawmill Liacence Renewal करिता ऑनलाईन प्रणाली

4) महाराष्ट्र वनविकास महामंडळाने प्राप्त केलेले FSC Certification

# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम 1 – सुकर जीवनमान


## 1. महा वन्यजीव भरपाई ॲप


**पुर्वीची स्थिती:-**

1. नागरिकांना पीकनुकसानी, पशुधनहानी व मनुष्यहानी ईत्यादिकरिता वनविभागाच्या कार्यालयात जावून ऑफलाईन पद्धतीने अर्ज करावा लागत होता.
2. तसेच अर्जाची सद्यस्थिती पाहण्यासाठी प्रत्येकवेळी वनविभागाच्या कार्यालयात जावून विचारणा करावी लागत होती.

**आत्ताची स्थिती:-**

1. सर्व नागरिक घरबसल्या मोबाईलवर महा वन्यजीव भरपाई ॲप डाऊनलोड करून पीकनुकसानी, पशुधनहानी व मनुष्यहानी ईत्यादिकरिता अर्ज करु शकतात.
2. तसेच अर्जाची सद्यस्थिती सहजरित्या मोबाईलवर उपलब्ध होणार
3. नागरिकांना याकामाकरिता वनविभागाच्या कार्यालयात जावे लागणार नाही




# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम 1 – सुकर जीवनमान

## 1.वन्यजीव सफारी बुकींग प्रणाली संकेतस्थळ www.mahaecotourism.gov.in

**पुर्वीची स्थिती:-**

1. पर्यटकांना अभयारण्यात/ राष्ट्रीय उद्यानात वन्यजीव सफारी बुकींग साठी वनविभागाच्या कार्यालयात जावून ऑफलाईन पद्धतीने बुकींग करावे लागत होते.

2. त्यामुळे वन्यजीव सफारी बुकींग शिल्लक नसल्यास पर्यटकांना अभयारण्यात येऊन सफारी न करता जावा लागत असे.




**आत्ताची स्थिती:-**

1. सर्व पर्यटक घरबसल्या ऑनलाईन वन्यजीव सफारी बुकींग प्रणाली संकेतस्थळ www.mahaecotourism.gov.in वर सफारी बुकींग करु शकतात.

2. पर्यटकांना याकामाकरिता वनविभागाच्या कार्यालयात जावे लागणार नाही






# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम 2– कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

## 1. State Plan Schemes Monitoring Systems

**पुर्वीची स्थिती:–**


1. वनविभागाच्या विविध राज्य योजनांमध्ये प्रस्तावित कामांचे निधी मागणी प्रस्ताव ऑफलाईन पद्धतीने मंत्रालयात प्राप्त होत असे व त्याकरिता जास्त वेळ लागत असे.


2. तसेच प्रस्ताव सद्यस्थितीत कोणत्या कार्यालयात प्रलंबित आहे हे तपासण्यासाठी प्रत्येकवेळी बैठक/ व्हीसी/फोनद्वारे आढावा घ्यावा लागत असे.

**आत्ताची स्थिती:–**

1. सर्व वनविभागांचे विविध राज्य योजनांमध्ये प्रस्तावित कामांचे निधी मागणी प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने मंत्रालयात प्राप्त होतात त्यामुळे वेळेची बचत होते .

2. तसेच प्रस्ताव सद्यस्थितीत कोणत्या कार्यालयात प्रलंबित आहे याची माहिती सहजरित्या संगणकावर उपलब्ध होते.



# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम 2 – कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा


## 2. Wage Bill Monitoring Systems


**पुर्वीची स्थिती:-**

1. वनविभागात विविध ठिकाणी काम करत असलेल्या मजुरांची मजुरीबाबत निधी मागणी प्रस्ताव ऑफलाईन पद्धतीने मंत्रालयात प्राप्त होत असे व त्याकरिता जास्त वेळ लागत असे.
2. तसेच प्रस्ताव सद्यस्थितीत कोणत्या कार्यालयात प्रलंबित आहे हे तपासण्यासाठी प्रत्येकवेळी बैठक/ व्हीसी/फोनद्वारे आढावा घ्यावा लागत असे.

**आत्ताची स्थिती:-**

1. सर्व वनविभागांचे मजुरांची मजुरीबाबत निधी मागणी प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने मंत्रालयात प्राप्त होतात त्यामुळे वेळेची बचत होते .
2. तसेच प्रस्ताव सद्यस्थितीत कोणत्या कार्यालयात प्रलंबित आहे याची माहिती सहजरित्या संगणकावर उपलब्ध होते.



# धन्यवाघ

